# ''पुण्य-पाप आणि सुख''

अनेक युगापासून मनुष्य सुखाच्या मागे धावत आहे परंतु हे सुख त्याच्या पासून दूर पळते. सुखाकरीता मानवाने अनेक साधनाचा अविष्कार केला. परंतु अनेक साधनांनी त्याला आणखीनच त्याला भटकवलेले आहे. सूखाकरीता त्याने धनाला आधार बनवले. परंतु तोच धनाच्या गुलाम झाला. सुखाकरीता त्याने संबंधाचा विस्तार केला परंतु संबंधितानी त्याला धोखा दिला.

सुख आणि दुःख ह्या मनाच्या स्थितीचे नाव आहे. मनासारखी वस्तु प्राप्त होताच मनुष्य सुखी होतो. जर इच्छापुर्ती झाली नाही तर मनुष्य दुःखी होतो. परंतु या संसारात असेही काही लोक आहेत जे प्रत्येक परिस्थितीत सुखी राहणे मानतात.

आज संसारात पापाचा प्रकोप वाढतो आहे. सुखाकरीता मनुष्य पापही करीत आहे. परंतु आपल्याला माहीत आहे की, पाप मनुष्याला खरे सुख देऊ शकत नाही. पुण्य माणसाची खरी दौलत आहे. या पुण्याने मनुष्य हा खऱ्या सुखाचा धनी होऊ शकतो. परंतु आजचा मानव धनाने खरे सुख विकत घेऊ पाहत आहे. आणि पापाचे धन संग्रह करतात त्यामुळे जीवनात सुखाची कमी व दुःखाचा भडिमार राहतो. आजचा मानव पाप करुन कमवितो, पापाची कमाई खातो. पाहतो, ऐकतो. प्रत्येक सेकंदाला मनुष्य पापाचा व्यापार करतो. ह्या पापाने मनुष्याला भय आणि तणाव चिंता वाढविली आहे. जे पुण्यात्मा आहे ते भयभीत होत नाही. प्रत्येक परिस्थितीत पूण्य त्याचे रक्षण करतात.

पाप नेहमी मनुष्याच्या बुध्दिला भारी बनवितो. पुण्य नेहमी मनुष्याला पक्ष्याप्रमाणे आनंदात खुशीत उडवितो. राक्षसाच्या चेहऱ्यांवर पापाचे जीत जागते उदाहरण आहे. परंतु देवतांच्या प्रतिमा पुण्य कर्माची प्रतिछाया आहे.

पापी व्यक्ती झोपेतही सुखाचा अनुभव करु शकत नाही. दिवसा जरी तो आपल्या सद्सद् विवेक बुध्दीला दाबुन मीच सर्वश्रेष्ठ समझतो परंतु झोपेत त्याची वास्तविकता त्याला भयभीत करते, पुण्याची चादर ओढणारा व्यक्ती झोपता पण सुखात जागतो. हे पाप काय आहे ? ज्याने मनुष्याला धर्म व सत्य यापासून दूर केले आहे, ते पाप आहे स्वार्थ, धोका, हिंसा, वैरभाव, कुदृष्टि, भेसळ, भ्रष्टाचार, आत्याचार आणि अपवित्रता. अधिक तर मनुष्याचे म्हणणे आहे की, आम्ही तर पापाला भितो, परंतु त्याना पापाचे गुह्य गतीचे ज्ञान नाही. दुसऱ्याकरीता वाईट चिंतन करणे, मुखाने दुःख देणारे बोलणे, कोणाची खुशी गायब करणे, दुसऱ्याना शाप देण, हे सगळे छोटे पाप नाही !

पुण्य कर्म कोणते आहे ? ज्याच्या मुळे मानव आपल्या जीवनाला सुखी करु शकतो. पुण्य करण्याकरीता कुठल्याही धनाची किंवा संपत्तीची आवश्यकता नाही. एक गरीब व्यक्तीही पुण्याईच्या कमाईने धनवान बनु शकतो. असहाय व्यक्तीला सह्योग देणे दुसऱ्याचे दुःख कमी करणे, आपल्या व्यवहाराने सर्वांना सुख देणे, हे सर्व पुण्य कर्म आहेत.

आपण सर्व पुण्याईची पुंजी वाढवून आपल्या आणि आपल्या परिवाराच्या जीवनाला सुखी करु, जेणे करुन दुःख आपले दरवाजे ठोठावणार नाही.  पुण्य मनुष्याला शक्तीही देत असतो.  पुण्य आत्म्याच्या जीवनात जरी दुःख आले तरी तो त्यांच्यात दुःखी होत नाही तर तो त्यामधून ही सुखाचा मार्ग काढीत असतो.

सध्याच्या परिस्थितीत पापकटेश्वर परमात्मा आपल्याला पाप कर्मापासून मुक्त होण्याची विधी सांगत आहे आणि पूर्व जन्माच्या पाप नष्ट कोण्यासाठी राजयोग शिकवितो आहे.  आपण पापकर्मांची होळी करुन आणि सुखाच्या कर्मांनी आपली झोळी भरुन आपले जीवन स्वर्गासारखे सुखमय बनवू शकतो.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com